### राष्ट्रीय स्पर्धेत आदित्य मंदाडे याचे सुवर्ण यश

**पुसद** : देवनगरी, कर्नाटक येथे सुरू झालेल्या राष्ट्रीय स्तरावरील पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत विदर्भाच्या वतीने स्पर्धेत सहभागी झालेल्या आदित्य तुकाराम मंदाडे याने सुवर्ण पदकावर नाव कोरले. ही कामगिरी १८ वर्षांखालील वयोगटात त्याने डेडलिफ्ट प्रकारात केली असून, २५७.५ किलो वजन उचलून त्याने प्रथम क्रमांक पटकाविला. आदित्य हा पुसद येथील ज्ञानदीप अकॅडमीचा वर्ग १२ वीचा विद्यार्थी असून, कठोर मेहनत, सराव, आत्मविश्वास यांच्या जोरावर त्याने यश मिळविले. देशपातळीवर विदर्भाचा झेंडा फडकवल्याबद्दल आदित्यचे कौतुक होत आहे.

# ६२ मंडळांत अतिवृष्टी, घरांची पडझड, एकाचा मृत्यू, ७ जखमी

- 50 टक्के पेरण्यांना मिळाले जीवनदान
- येवती व वर्धा मार्गावरील वाहतूक बंद
- वाघाडी नदीला पूर ; तीन तास वाहतूक ठप्प



**यवतमाळ, दि.२७, महासागर प्रतिनिधी**:दीर्घ प्रतीक्षेनंतर यवतमाळ जिल्ह्यात बुधवारी धुवाँधार पावसाने हजेरी लावली. या पावसाने जिल्ह्यातील अनेक भागात कहर ओढवला. जिल्ह्यातील ६२ मंडळांत अतिवृष्टीची नोंद करण्यात आली. यात अनेक घरांची पडझड झाली, एकाचा मृत्यू झाला. पावसामुळे निर्माण झालेल्या पूर परिस्थितीने वाहतूक ठप्प झाली.

यवतमाळ जिल्ह्यात गेल्या २४ तासांत सरासरी ७० मिमी पावसाची नोंद करण्यात आली. या पावसाने सर्वत्र दाणादाण उडाली आहे. बोरीअरब येथे जुन्या पुलावरून पाणी वाहत होते, तर वाघाडी नदीला पूर आल्याने येथे तीन तास वाहतूक ठप्प झाली होती. महागाव तालुक्यातील करंजखेड रस्त्यावरील पुलाचा भराव वाहून गेल्याने वाहतूक बंद झाली होती. घाटंजी, आदिलाबाद मार्गावरील वाहतूक काही काळ बंद झाली होती. यासह जिल्ह्यातील छोट्या-मोठ्या रस्त्यांवरील वाहतूक काही काळ ठप्प होती. दरम्यान, हवामान विभागाने २९ जूनपर्यंत जिल्ह्यात ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.जिल्ह्यातील ६२ मंडळांत अतिवृष्टीची नोंद करण्यात आली. याठिकाणी ६५ ते १२० मिलीमीटर पाऊस कोसळला. याठिकाणी नदी, नाले आणि ओढ्यांना पूर आला. यामध्ये येळाबारा, घाटंजी, जोडमोहा, मेटीखेडा, चिखली, लोही, बोरी, सिंगद, लोनबेहळ, सावळी, अंजनखेड, नेर, मालखेड, पुसद, गौळ, शेंबाळपिंप्री, खंडाळा, बेलोरा, ब्राह्मणगाव, जांब बाझारा, वरूड, बोरी खुर्द, उमरखेड, मुळावा, विडूळ, चातारी, बिटरगाव, दराटी, निंगनूर, कुपटी, महागाव, मोरथ, गुंज, काळी, हिवरा, फूलसावंगी, कासोळा, पुनवट, शिरपूर, जळका, खडकडोह, मुकूटबन, शिबला, पांढरकवडा, पाटनबोरी, पहापळ, चालबर्डी, करंजी, रूंझा, केळापूर, घाटंजी, शिरोली, साखरा, शिवणी, घोटी, पारवा, कुर्ली, धानोरा, वाढोणा, वडकी, वरध, किन्ही याठिकाणी अतिवृष्टीची नोंद झाली आहे. या पावसामुळे ५० टक्के पेरण्यांना जीवनदान मिळाले आहे तर जिल्ह्यातील २० टक्के क्षेत्राचे अतिवृष्टीमुळे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. पावसाने येवती व वर्धा मार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती. येवती मार्गावरील वनोजा गावाजवळील पुलाचे बांधकाम मागील एक वर्षापासून कासव गतीने सुरू आहे. यामुळे येवती, धानोरा हा मार्ग बंद पडला होता. पुलाचे बांधकाम सुरू करताना बाजूने मातीचा लहानसा कमी उंचीचा रपटा तयार करण्यात आला. नाल्याच्या पुरामुळे हा रपटा पाण्याखाली गेल्याने वाहतूक बंद होती. देवळी तालुक्यातील कानगाव व वायगाव परिसरातील अनेक नाल्यांना मोठा पूर आल्याने वर्धा मार्गावरील वाहतूक काही तास बंद होती. अल्लीपूर मार्गे ही वाहतूक वळविण्यात आली. पारवा परिसरात मुसळधार पावसामुळे वाघाडी नदीला पूर गेला आहे. त्यामुळे उनकेश्वर-पारवा, अदिलाबाद, केळापूर, घाटंजी मार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती. त्यामुळे वाहनांची रांग लागली होती. वाघाडी नदीवरील शरद पुलावर दोन ते तीन फूट पाणी होते. यामुळे उनकेश्वर, आदिलाबाद आणि पारव्याकडे येणारी वाहने अडकून पडली.

पारवा ते केळापूर मार्गावरील शेख फरीद बाबा जवळील रपट्यावर चार फूट पाणी असल्यामुळे हा मार्गही दोन ते तीन तास बंद होता. येरणगाव जवळील पुलावर पाणी असल्यामुळे वाहतूक सकाळी दोन तास बंद होती. पुरामुळे पेरणी केलेले कापूस बियाणे वाहून गेले.

## अतिक्रमणधारकांचे बांधकाम विभागाला निवेदन



**नेर, दि.२७, महासागर प्रतिनिधी**: नेर सार्वजनिक बांधकाम विभागाने यवतमाळ-अमरावती रोडवर अतिक्रमण काढण्यासंदर्भात अतिक्रमणधारकांना नोटीस जारी केल्या आहेत. याबाबत अतिक्रमणधारकांनी सा.बां. विभागाला निवेदन दिले आहे. सध्या पावसाळा सुरू आहे. यवतमाळ-अमरावती महामार्गावर नालीच्या बाजूला गोरगरिबांची दुकाने आहेत. या व्यवसायावर त्यांचा प्रपंच चालतो. अतिक्रमणधारकाचा वाहतुकीस अडथळा नाही. प्रशासनाने सदर अतिक्रमण सात दिवसात काढावे, अशा नोटिसा बजावल्या आहेत. मात्र आम्हाला किमान सहा महिन्याचा अवधी द्यावा, अशी विनंती केली आहे.

निवेदन देताना अजबराव चिंचोळकर, बजरंग महाराज पापळकर, विष्णू तवकार, जुनेद खान, अब्रार खान, मंगेश भुजाडे, कपिल आगाशे, नीळकंठ मेहर, मोहम्मद शहजाद एजाज खान, हंसराज भगत, मोहम्मद नदीम, सुभाष केळकर, दिलीप माहुरे, सचिन माहूरे, अब्दुल राजिक सय्यद ईद्रीस, गणेश भाजीपाले, नदीम खा अब्दुल करीम, रजा शेख, राजेश धोटे आदी उपस्थित होते.

## उमरखेड येथील बाजार समितीने घेतला कर्जमाफीचा ठराव

**उमरखेड, दि.२७, महासागर प्रतिनिधी**: शेतकरी हिताला प्राधान्य देणारे संचालक मंडळ निवडून आल्यानंतर पहिल्याच बैठकीत उमरखेड बाजार समितीने पुन्हा एकदा शेतकरी हित जपत सोमवारी दि. २३ जून रोजी झालेल्या पहिल्याच बैठकीत संपूर्ण कर्जमाफीचा ठराव घेतला.

समितीचे संचालक भीमराव पाटील चंद्रवंशी यांनी त्या संबंधीचा प्रस्ताव मांडला होता. या विषयावर सविस्तर चर्चा झाल्यानंतर सर्वानुमते कर्जमाफीचा ठराव मंजूर करण्यात आला, अशी माहिती सभापती कृष्णा पाटील देवसरकर यांनी दिली.

उमरखेड बाजार समितीमध्ये नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत निवडून आलेल्या संचालकांची पहिलीच बैठक बाजार समितीच्या सभागृहात पार पडली. शेतकऱ्यांच्या शेतीमालाला जास्तीचा दर कसा मिळेल तसेच अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या मुलांना उमरखेड येथे राहण्यासाठी व्यवस्था करण्यासंदर्भातील धोरण ठरवण्या संदर्भात विचार विनिमय करण्यात आला. भविष्यात शेतकरी हिताच्या कामाला प्रथम प्राधान्य देण्याचेही संचालक मंडळाने ठरवले. तसेच व्यापारी वर्गातून पाच प्रतिनिधी घेऊन त्यांच्यासोबत चर्चा करून त्या संबंधाने येणाऱ्या अडीअडचणींविषयी तसेच बाजार समितीचे उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न करण्याचे ठरले.

यंदाच्या खरिपात पेरणीसाठी पैशाची सोय करण्याचे आव्हान शेतकऱ्यांसमोर आहे. त्यामुळेच शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यात यावी, असा ठराव घेतल्याचे सभापती कृष्णा पाटील देवसरकर यांनी सांगितले.

यावेळी बाजार समिती उपसभापती श्रीपाल आडे, संचालक प्रवीण पाटील मिरासे, प्रकाश नरवाडे, कैलास मोरे, गजानन गाडेकर, शिवराम कदम, सचिन देवसरकर, दैवशाली वानखेडे, चंद्रकला इंगळे, गजानन देवसरकर, विश्वास कांबळे, भीमराव चंद्रवंशी, राधेश्याम भट्टड, विवेक कन्नावार, विकार खतीब व सचिव संदीप जाधव उपस्थित होते.

## अकरावी प्रवेशाच्या यादीची प्रतीक्षा




**यवतमाळ , दि.२७, महासागर प्रतिनिधी**: उच्च माध्यमिक विद्यालयात २०२५-२६ पासून इयत्ता अकरावीची प्रवेश प्रक्रिया केंद्रीय ऑनलाइन प्रणालीद्वारे करण्यात येत आहे. कॅप राऊंडसाठी गुणवत्ता यादी गुरुवारी जाहीर होणार होती. दुपारी १२ वाजेपासून रात्री साडेआठ वाजेपर्यंत प्रतीक्षा करूनही लॉगीनला गुणवत्ता यादी न आल्याने मुख्याध्यापक पेचात पडले होते. इयत्ता दहावीचा निकाल लागून दीड महिन्यांचा कालावधी झाला आहे. मात्र, ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेमुळे विद्यार्थ्यांची डोकेदुखी वाढली असून, अनेकांचा जीवही टांगणीला लागला आहे. एकही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहणार नाही, सर्वांना प्रवेश मिळेल, असे माध्यमिक शिक्षण विभागाकडून सांगण्यात येत आहे. गुरुवारी गुणवत्ता यादी जाहीर झाल्यानंतर शुक्रवार (दि.२७ जून) पासून अकरावीसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू होणार होती. मात्र, यादीच लॉगीन आयडीला आली नाही. त्यामुळे प्रवेशाचे काय होणार याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. रात्री उशिरापर्यंत यादी येऊ शकते, अशी माहिती माध्यमिक शिक्षण विभागाकडून देण्यात आली. अनेक विद्यार्थ्यांपुढे यातून प्रवेशासाठीचाही पेच निर्माण झाला आहे.

## लसीकरणाअभावी आजाराचा धोका

**दिग्रसः** तालुक्यातील पशुवैद्यकीय दवाखान्याचा कारभार सध्या वाऱ्यावर आहे. पशुधनावर उपचार होत नसल्याने शेतकऱ्यांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. पावसाळ्यात लसीकरणाअभावी जनावरांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. उपचारासाठी पशुपालकांना रुग्णालयात चकरा माराव्या लागत असून, कर्मचारीच उपस्थित राहत नसल्याने निराश होऊन परत यावे लागत आहे. लिंगी येथील पशुचिकित्सालयाची स्थितीही यापेक्षा वेगळी नाही. अनेक गावामध्ये अद्यापही लसीकरण झाले नाही. यामुळे जनावरांना मोठ्या आजाराचा होण्याचा धोका वाढला आहे, अशी ओरड शेतकऱ्यांमधून होत आहे. कर्मचारी नेमणुकीच्या ठिकाणी नियमित कर्तव्यावर जात नाही. यासंदर्भात प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी पशुधन विकास अधिकारी पी. एस. नरांजे यांच्या भ्रमणध्वनीवर संपर्क केला असता, नॉट रिचेबल येत होता. कार्यालयातही उपस्थित नव्हते.

## किन्ही नंदपूर शेत शिवारात वन्यप्राण्यांचा धुमाकूळ



**पांढरकवडा, दि.२७, महासागर प्रतिनिधी**: तालुक्यातील किन्ही (नंदपूर) परिसरातील अनेक शेतकऱ्यांच्या शेतामध्ये वन्यप्राण्यांनी हैदोस घातला असून पेरलेल्या बियाण्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. काही शेतातील निघालेले बियाण्यांचे अंकुर वन्यप्राणी जमीनदोस्त करत आहे. या जंगली जनावरांचा तातडीने बंदोबस्त करण्यात यावा, अशी मागणी त्रस्त शेतकऱ्यांनी उपविभागीय अधिकाऱ्यांकडे दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

मागील वर्षीदेखील याबाबत वनविभागाकडे शेतकऱ्यांनी निवेदन दिले होते. परंतु या निवेदनाची दखल घेण्यात आली नव्हती. मागील हंगामात तालुक्यात अतिवृष्टी झाल्याने पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. त्याचप्रमाणे वन्य प्राण्यांनीही पिकांचे मोठे नुकसान केले होते. यावर्षीसुद्धा पेरलेले बियाणेच वन्यप्राणी उकरून खात असल्याने शेतकरी त्रस्त झाले आहेत. किन्ही (नंदपूर) शिवारात गेल्या काही दिवसापासून वन्यप्राण्यांचे कळप कोवळी पिके उद्ध्वस्त करत आहेत. त्यामुळे अशा ठिकाणी शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागत आहे.

आधीच उसनवारी करून कृषी केंद्रातून बियाणे आणलेल्या शेकडो शेतकऱ्यांना बँक व सोसायटीने पीक कर्ज नाकारले आहे. थकबाकीदार शेतकरी तर खासगी सावकार व मायक्रो फायनान्स कंपनीकडून कर्ज उचलून शेती उभी करत आहे. अशा शेतकऱ्यांचे पेरलेले बियाणे आता वन्यप्राणी उकरून टाकत आहे. संबंधित विभागाने वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करावा, नुकसानभरपाई देऊन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी अभय कट्टेवार, पवन बाकमवार, बुधाराम समृतवार, पांडुरंग लिंगरवार, पुंडलिक ठाकरे, मारुती ठाकरे, संतोष सामृतवार, महादेव ठाकरे, राहुल बंडेवार, रमेश आदे, गजानन डावरे, पुरुषोत्तम अक्कलवार, अमोल आदे, कैलास लिंगरवार, संतोष केराम, पांडुरंग प्रधान, अनिकेत ठाकरे आदीसह शेतकऱ्यांनी केली आहे.

## रस्त्याच्या अर्धवट कामामुळे नालीचे पाणी घरात

**घाटंजी**: येथील नेहरू नगरमधील परशुराम मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याचे काम अर्धवट करण्यात आले. तसेच नालीही बुजली आहे. त्यामुळे पावसाचे पाणी नागरिकांच्या घरात घुसत आहे. येथील ढाले यांच्या घरापासून ते कुंटलवार यांच्या घरापर्यंत जवळपास ८० मीटरचा सिमेंट रस्ता तयार करण्यात आला. परंतु हा रस्ता दोन्ही बाजूंनी तयार करून मध्येच शंकर भोयर यांच्या घराजवळ १० ते १५ मीटरपर्यंत केवळ खोदकाम केले. रस्ता बनविण्यातच आला नाही. त्यामुळे रस्ता कुठे उंच तर कुठे खोल असा झाला आहे. रस्त्यावरच गिट्टीही पडून असल्याने वाहन चालक आणि पादचारी नागरिक त्रस्त आहेत.

## वेदधारिणी दुर्गादेवी मंदिरात सामूहिक उपासना



**यवतमाळ** : श्री स्वामी समर्थ १९२ वी सामुहिक उपासना वेदधारणी दुर्गादेवी मंदिर आनंदनगर या ठिकाणी रविवारी दि. २२ जून रोजी सकाळी १० वाजता स्वामी भक्तांच्या उपस्थित संपन्न झाली. परिसरातील स्वामी भक्तांनी पादुकांच्या दर्शनासाठी व उपासनेसाठी सकाळी दहा वाजता हजेरी लावली. स्वामींच्या व श्री दत्तगुरूंच्या दुर्मिळ स्तोत्र आणि मंत्रांच्या सामूहिक पठणाने दुर्गादेवी मंदिर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाले. उपासना झाल्यावर सर्वांनी स्वामींच्या पादुकांवर नतमस्तक होऊन दर्शन घेतले व उपासनेच्या शेवटी श्री स्वामी समर्थ सामूहिक उपासना सेवा संस्थे मार्फत चालणाऱ्या स्वामीभोज अन्नदान सेवा, सामूहिक नामस्मरण, भजन सेवा, स्वामी गोवंश सेवा, व सामूहिक उपासना याबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली. शेवटी सर्व स्वामी भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

## घरकुल मंजूर झाले, खात्यात पैसे नाही आले



**बाभूळगाव, दि.२७, महासागर प्रतिनिधी**: घरकुल मंजूर झाल्याच्या यादीत नाव असूनही बांधकामाचा हप्ता मिळाला नाही. यासाठी गणोरी येथील लाभार्थी शेख जाबीर यांना पंचायत समिती कार्यालयात हेलपाटे घ्यावे लागत आहे. या संदर्भात त्यांनी गटविकास अधिकारी पद्माकर मडावी यांना निवेदन सादर केले.

शेळ्या चारून कुटुंबाचा गाडा पुढे रेटणारे शेख जाबीर शेख हुसेन (४५) यांचे नाव ग्रामपंचायतीच्या बेघरांच्या सर्व्हेमध्ये आले. त्यांच्यासह इतरांच्या नावाची यादी गणोरी ग्रामपंचायतीकडून बाभूळगाव पंचायत समितीकडे आली. दि. २७ जानेवारी २०२६ च्या घरकुल मंजुरीच्या यादीत त्यांचे नाव आहे. फेब्रुवारी महिन्यांपासून ते पंचायत समितीत दोन दिवसांपूर्वी त्यांना तुमचा आधार कार्ड अपडेट करून आणा पैसे टाकतो असे सांगण्यात आले. सेतू सुविधा केंद्रात त्यांनी आधार अपडेट करून घेतले.

आधार अपडेट झाल्याची खात्री पंचायत समितीच्या घरकुल विभागाने करून घेतली. यानंतरही त्यांना रक्कम मिळाली नाही. या संदर्भात गटविकास अधिकारी पद्माकर मडावी यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी गणोरी ग्रामपंचायतच्या सचिवांसोबत भ्रमणध्वनीवर विचारणा केली. शेख जाबीर यांचे घर अतिक्रमणात असल्याचे सांगण्यात आले. त्यांच्याकडे घराचा नमुना आठ आहे. त्यात मालकी हक्कामध्ये मालकाचे नाव शेख जाबीर नोंदलेले आहे. त्यांच्या भिंतीला भिंत लागून असलेल्या इसमाला घरकुलाचा लाभ दिला आहे.

यावरून पंचायत समितीच्या घरकुल विभागात सावळा गोंधळ सुरू असल्याचे दिसून येते. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेने या प्रकाराकडे लक्ष देण्याची गरज आहे.

### रेती वाहतुकीचा ट्रॅक्टर जप्त



**राळेगाव**: विनापरवाना रेतीची चोरटी वाहतूक करणारा ट्रॅक्टर महसूल पथकाने जप्त करून तहसील कार्यालयात लावला आहे. ही कारवाई मंगळवारी सकाळच्या सुमारास लोहारा चौफुलीवर करण्यात आली. रूपेश जनार्दन गाते (रा. राळेगाव) हा विनाक्रमांकाच्या ट्रॅक्टरने रेतीची चोरटी वाहतूक करीत असताना तलाठ्यांनी त्याला पकडले. रेती चोरीप्रकरणी दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. तालुक्यात रेती तस्करी सुरूच असल्याने महसूल बुडत आहे.

## » संक्षिप्त...

### शेतकऱ्याच्या मुलाचे 'नीट'परीक्षेत यश



**दिग्रसः** तालुक्यातील तिवरी येथील एका अत्यल्प भूधारक शेतकर्याच्या मुलाने 'नीट' परीक्षेत उज्ज्वल यश मिळविले आहे. विश्वदीप उल्हास सावळे असे त्याचे नाव असून, त्याने ५३२ गुण मिळवून डॉक्टर होण्याचे स्वप्न तो साकार करणार आहे. केवळ दोन एकर शेतीवर कुटुंबाचा उदरनिर्वाह चालत असल्याने, विश्वदीपची परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. मात्र, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर त्याने आपले ध्येय गाठले. त्याचे प्राथमिक शिक्षण तिवरी येथे, पाचवी ते दहावीपर्यंतचे शिक्षण दिग्रसच्या दिनबाई विद्यालयात, तर अकरावी-बारावीचे शिक्षण रुई तलाव येथील बळीराम राठोड कनिष्ठ महाविद्यालयात झाले. त्यानंतर नांदेड येथील कोचिंग क्लासमध्ये त्याने परीक्षेची तयारी केली. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत, त्याने आपल्या वडिलांचे स्वप्न साकार केले आहे. त्याच्या या यशामुळे आता सर्वच स्तरांतून त्याच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

### श्रुती वेट्टीचा जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या हस्ते सन्मान



**यवतमाळः** श्रुती वेट्टीच्या उल्लेखनीय यशाबद्दल तिचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. उमरी रोड येथील वि. जा. भ. ज. माध्यमिक आश्रमशाळेतील विद्यार्थिनी श्रुती श्रीकृष्ण वेट्टी हिने इयत्ता दहावीच्या परीक्षेत शाळेतून प्रथम क्रमांक मिळविला. शाळेचे तसेच आपल्या आई-वडिलांचे नाव उज्ज्वल केले. या उल्लेखनीय यशाबद्दल तिचा यवतमाळ जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या हस्ते सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. तसेच प्रमाणपत्र देऊन तिला गौरविण्यात आले. या यशाबद्दल श्रुती वेट्टीचे पांढरकवडा परिसरात कौतुक होत आहे.

### ब्राह्मणवाडा पश्चिम शाळेत स्वच्छता आणि आरोग्याचा संदेश



**नेर**: तालुक्यातील ब्राह्मणवाडा पश्चिम येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेमध्ये आंतरराष्ट्रीय योगदिन उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये योगाबाबत जनजागृती निर्माण करून त्यांना सुदृढ आरोग्यासाठी योगाचे महत्त्व पटवून देण्यात आले. यानिमित्त परिसर स्वच्छ करण्याचा उपक्रम राबविण्यात आला. यात उर्फान शेख, किशोर बाजड, योगीराज ठाकरे, ललित खडसे, सूरज गावंडे, पंकज काळे, अंकुश अगम, सूरज ठोंबरे आदींनी शाळा परिसरातील स्वच्छता मोहीम राबविताना सामाजिक भान दाखविले. उपक्रमात मुख्याध्यापिका शितल दुधे, तसेच कीर्ती गवई, प्रीतम मेंढे, जयवंता राठोड, हर्षा गावंडे यांनीही सक्रिय सहभाग घेत शाळेच्या उपक्रमास हातभार लावला. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये योगसाधना व स्वच्छतेविषयी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाला असून अशा उपक्रमांनी गाव व शाळा यांच्यातील सुसंवाद अधिक बळकट होतो, असे मत शिक्षकांसह नागरिकांनी व्यक्त केले.

### डॉ. नंदूरकर विद्यालयात फटाके फोडत विद्यार्थ्यांचे स्वागत



**यवतमाळः** सत्चिकित्सा प्रसारक मंडळाच्या वतीने संचालित डॉ. नंदुरकर विद्यालयात उन्हाळाच्या सुट्टीनंतर २३ जूनला पहिली शाळेची घंटा वाजली. यानिमित्त शाळेत फटाके फोडत विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. सोमवारी शाळेच्या प्रारंभी नवीन विद्याथ्यर्थ्यांसाठी प्रवेशोत्सव आयोजित करण्यात आला होता. त्यामध्ये ढोल ताशाच्या गजरात, एक ताला टाळ्या वाजवत, फटाके फोडून नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. नवीन विद्यार्थ्यांना विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ज्योती बाविस्कर यांच्या हस्ते चॉकलेट वाटप करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार वाटप करण्यात आला. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना शासनातर्फे आलेली पाठ्यपुस्तके वितरित करण्यात आली. विद्यार्थ्यांचा शाळेच्या पहिल्या दिवशी उत्साह बघण्यासारखा होता. नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचे पालकही याप्रसंगी उपस्थित होते. शाळा प्रवेशोत्सवासाठी मुख्याध्यापिका ज्योती बाविस्कर यांच्या मार्गदर्शनात समस्त शिक्षक तथा कर्मचारी वृंदांनी सहकार्य केले.

### राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना अभिवादन

**यवतमाळ** : राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त छत्रपती शाहू चौकात अभिवादन करण्यात आले. यावेळी ओबीसी जन मोर्चा, भारतीय पिछडा शोषित संघटन, ओबीसी क्रांती दल या संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते, यावेळी डॉ. विलास काळे, राजू देशमुख, मंगला मून, हेमंत जगताप, दहिकर अशोक महल्ले, प्रधान खुडुकले, नरेंद्र गद्रे, देविदास मुनेश्वर, हरिदास अभंग, आनंद भगत, राजू रोकडे, सदानंद बोर्पीनवार, सिद्धार्थ देठे, राजू गुल्हाने, ज्ञानेश्वर रायमल यांनी आपले मत व्यक्त केले.

